# शेतकरी उत्पादक संघटनांसाठी विशेष परिषदेचे आयोजन

**पुणे :** शेतकरी उत्पादक संघटनांना बळ देणे आणि तंत्रज्ञान, वित्तपुरवठा व कच्च्या मालाच्या पुरवठ्याद्वारे या संघटनांची क्षमता वाढवण्यासाठी नुकत्याच एका परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

'स्मॉल फार्मर्स ग्रिबिझनेस कन्सोर्शियम'तर्फे (एसएफएसी) नुकतेच पुण्यात 'महाराष्ट्र ग्रिबिझनेस कॉन्क्लेव्ह' (एमएसी) या परिषदेचे आयोजन करण्यात आले. शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या प्रसारासाठी व शाश्वततेसाठी सरकारचे वरिष्ठ अधिकारी, कंपन्या, बँकेचे अधिकारी, शेतकरी उत्पादक कंपन्यांचे प्रतिनिधी, तसेच शिक्षण तज्ज्ञ अशा सर्व सहयोगींनी या परिषदेत भाग घेतला. २०० हून अधिक शेतकरी उत्पादक कंपन्या, १०० कंपन्या व बँकांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते. शेतकरी उत्पादक कंपन्यांनी आपली उत्पादने सादर केली, तसेच कंपन्यांशी चर्चाही केली.

या परिषदेत तज्ज्ञांनी शेतकऱ्यांच्या समस्या मांडल्या. 'एसएफएसी'चे व्यवस्थापकीय संचालक सुमंता चौधरी व 'बँक ऑफ बडोदा'चे ग्रामीण व कृषी बँकिंग आणि सीएसआर विभाग प्रमुख, तथा सरव्यवस्थापक बी. आर. पटेल यांनी शेतकरी उत्पादक संघटनांची सर्वांगीण वाढ व विकासासाठी एका सामंजस्य करारावर सह्या केल्या.

चौधरी म्हणाले, शेती हा उद्योग अधिक शाश्वत व नफाक्षम बनवण्यासाठी अधिकाधिक सहयोगींना सहभागी करण्याच्या हेतूने महाराष्ट्रात शेतकरी उत्पादक संघटनांची संख्या वाढवण्याची गरज आहे.

पटेल म्हणाले, बँक ऑफ बडोदाने एसएफएसीला तीन कोटी नऊ लाख रुपये साह्य देण्याची कटिबद्धता प्रकट केली आहे. शेतकरी उत्पादक संघटनांच्या प्रसारात आम्ही आघाडीची भूमिका बजावणार आहोत.

पुण्यातील या परिषदेचे आयोजन 'एसएफएसी'ने 'ॲग्रिकल्चरल अँड प्रोसेस्ड फूड प्रॉडक्ट्स एक्स्पोर्ट डेव्हलपमेंट ऑथॉरिटी' (अपेडा), 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ रुरल डेव्हलपमेंट अँड पंचायती राज' (एनआयआरडीपीआर), 'पीएचडी चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज' व 'महा फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लिमिटेड' (महा-एफपीसी) यांनी केले.